# जीपीएस विद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती अभियान




सायबर सुरक्षेबाबत माहिती देताना साक्षी पाटील, विद्या सोनवणे.

**पाळधी** | भाऊसाहेब गुलाबरावजी पाटील विद्यालय येथे इयत्ता ५ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती विषयावर विशेष मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. मुख्याध्यापक कणखरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सत्रात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठतील विद्यार्थिनी साक्षी पाटील व विद्या सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, ओटीपी व पासवर्ड सुरक्षितता, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि सायबर गुन्ह्यांपासून बचाव याविषयी मार्गदर्शन केले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्राला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.